11 APR 2022 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सम्राट अशोकना सामाजिक एकीकरणाचे श्रेय

## हैद्राबादचे विचारवंत डॉ. हेमंत तिरपुडे : विद्यापीठात फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह



कोल्हापूर : विद्यापीठातील 'फुले शाहू आंबेडकर सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, केंद्राचे समन्वयक डॉ. श्रीकृष्ण महाजन.

प्रतिनिधी
कोल्हापूर

सम्राट अशोक यांनी प्राचीन भारताला त्याचा एकीकृत राजकीय नकाशा तर प्रदान केलाच, पण त्यापुढे जाऊन या देशाचे सामाजिक–सांस्कृतिक एकीकरण करण्याचे श्रेयही त्यांचेच आहे, असे प्रतिपादन हैदराबादचे विचारवंत डॉ. हेमंत तिरपुडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव, आझादी का अमृत महोत्सव आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष अशा संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित 'फुले–शाहू–आंबेडकर ससाहा"च्या उद्घाटनप्रसंगी 'प्रियदर्शी सम्राट अशोक यांचे कल्याणकारी राज्य" या विषयावर ते ऑनलाईन बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. तिरपुडे म्हणाले, सम्राट अशोकांच्या शांती व करुणेच्या संदेशाचा प्रभाव होता. त्यामुळे आशिया खंडात एकही मोठे युद्ध झाले नाही. अशोकाच्या राजकीय व आर्थिक धोरणांचा प्रभाव सर्वदूर होता. त्यामुळेच अशोकस्तंभावरील सिंहमुद्रा आणि भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र आपली राष्ट्रीय मानचिन्हे बनली आहेत. प्र–कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील म्हणाले, फुले, शाहू आंबेडकर ही मानवतावादी विचारांची अखंड व अभेद्य शृंखला आहे. डॉ. आंबेडकर केंद्र विविध अभ्यासक्रम चालविते, अध्यक्ष कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, सम्राट अशोक यांच्या जयंतीपासून ते आंबेडकर जयंतीपर्यंत फुले, शाहू आंबेडकर यांच्या प्रबोधनपर विचारांचा जागर करण्याची संकल्पना डॉ. आंबेडकर केंद्राची आहे. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापुरात उभारलेली वसतीगृह चळवळ ही बहुजन विद्यार्थ्यांचा शैक्षणिकच व सर्वांगीण उद्धार करणारी आहे. पीजी डिप्लोमा व सर्टिफिकेट अभ्यासक्रमांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र ग्रंथभेट देऊन गौरविले. केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपा श्रावस्ती यांनी परिचय करून दिला. डॉ. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. अमोल मिणचेकर यांनी आभार मानले.

11 APR 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पंजाबराव देशमुख हे फुले, शाहूंचे वैचारिक वारसदार : डॉ. मोहिते

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : ''डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती, शिक्षण, सहकार आणि अस्पृश्यता निवारण क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी कर्मकांडाला आणि जातीभेदाला विरोध दर्शविला. देवस्थानच्या उत्पन्नाचा उपयोग शिक्षण आणि आरोग्यासाठी केला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. समाजपरिवर्तनासाठी त्यांनी क्रांतिकारक कृतिशीलता दाखविली. पंजाबराव देशमुख हे फुले-शाहूंचे वैचारिक वारसदार होते,'' असे प्रतिपादन डॉ. अंबादास मोहिते यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित फुले शाहू आंबेडकर सप्ताहांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिनानिमित्त 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाजपरिवर्तन कार्य' यावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. केंद्राचे संचालक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.



डॉ. मोहिते

डॉ. मोहिते म्हणाले, ''पंजाबराव देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या हक्कासाठी निष्ठेने लढा दिला. दिल्लीमध्ये जागतिक कृषी प्रदर्शन त्यांनी भरविले. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला पूरक असे कार्य त्यांनी केले. जातीभेद नष्ट झाला पाहिजे, यासाठी मंदिर प्रवेश आंदोलन चालविले. ते यशस्वी केले. शिक्षण सक्तीचे करण्याचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले.''

प्रा. महाजन म्हणाले, ''डॉ. पंजाबराव देशमुख हे कृषक क्रांतीचे जनक होते. समाजपरिवर्तनासाठी त्यांनी केलेले कार्य महत्त्वाचे आहे. त्यांना पूर्व महाराष्ट्राचे कर्मवीर म्हटले पाहिजे. तसेच शेतकरी कर्जमुक्तीचा त्यांचा प्रयोग आजही मार्गदर्शक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्रथम कार्यकारिणीचे सदस्य म्हणून निवडले होते. तसेच घटना समितीचे सदस्य म्हणून भाऊसाहेबांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण ठरले आहे. डॉ. आंबेडकरांनी भाऊसाहेबांचा त्यासाठी गौरवपर उल्लेख केला आहे.''

प्रा. अमोल मिणचेकर यांनी स्वागत केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. प्रा. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले.

तरुण भारत

# पंजाबराव देशमुखांना फुले, शाहूंच्या विचारांचा वारसा

कोल्हापूर : डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शेती, शिक्षण, सहकार व अस्पृश्यता निवारण या क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी कर्मकांडाला व जातीभेदाला विरोध दर्शविला. देवस्थानच्या उत्पन्नाचा उपयोग शिक्षण व आरोग्यासाठी केला पाहिजे. समाजपरिवर्तनासाठी त्यांनी क्रांतिकारक कृतिशीलता दाखविली. पंजाबराव देशमुख हे फुले–शाहूंचे वैचारिक वारसदार होते, असे प्रतिपादन अमरावती येथील डॉ. अंबादास मोहिते यांनी केले.



■ **डॉ. अंबादास मोहिते यांचे मत**

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित फुले, शाहू, आंबेडकर सप्ताहांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिदिनानिमित्त 'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे समाजपरिवर्तन कार्य' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. मोहिते म्हणाले, पंजाबराव देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला पूरक कार्य केले. मंदिर प्रवेश आंदोलन, शिक्षण सक्तीचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरले.

प्रा. महाजन म्हणाले, डॉ. पंजाबराव देशमुख यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्रथम कार्यकारिणीचे सदस्य म्हणून निवडले होते. तसेच घटना समितीचे सदस्य म्हणून भाऊसाहेबांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण ठरले आहे. प्रास्ताविक प्रा. अमोल मिणचेकर यांनी केले. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. प्रा. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले.